**मार्गदर्शन** | उमरगा येथे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. डी. बी. ढोबळे यांचे म

# बलशाली राष्ट्र निर्माणासाठी महापुरुषांच्या विचारांनी प्रेरित होऊन सामाजिक बदल करा

प्रतिनिधी । उमरगा

समाजकार्याचे बाळकडू युवकांना महाविद्यालयीन जीवनात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राबवण्यात आलेल्या उपक्रमातून मिळत असते. लोकमान्य टिळक, अण्णा भाऊ साठे यांनी बलशाली राष्ट्र निर्माण करण्यासाठीच कार्य केले असून, युवकांनी त्यांच्या कार्य व विचारातून प्रेरित होऊन सामाजिक बदलासाठी पुढे आले पाहिजे, असे मत डॉ. डी. बी. ढोबळे यांनी व्यक्त केले.

शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथीनिमित्त बुधवारी (दि.१) राष्ट्रीय सेवा योजना शिबिर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात डॉ. डी. बी. ढोबळे बोलत होते. उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले अध्यक्षस्थानी होते. यावेळी उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर, प्रा. आर. एम. सूर्यवंशी, डॉ. एम. एस. निर्मळे, प्रा. डी. डी. पांढरे उपस्थित होते. डॉ. संजय अस्वले म्हणाले की, विद्यार्थ्यांनी महापुरुषांची जयंती व पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांचे स्मरण करून कार्याचे अनुकरण आपल्याही जीवनात करावे. डॉ. ए. एस. शिंदे, डॉ. आर. आर. नितनवरे, डॉ. जी. एम. सोमवंशी, डॉ. आर. एम. खराडे, डॉ. ए. डी. देशमुख, डॉ. एस. एस. रेवले, व्ही. एस. सूर्यवंशी, डॉ. ए. के. कटके, डॉ. डी. एस. इटले, डॉ. एस. डी. गायित, डॉ. डी. एस. चित्तमपल्ले, डॉ. एस. एम. सुरवसे, डॉ. डी. व्ही. पोदर, डॉ. ए. एस. आल्टे, डॉ. सी. डी. करे, डॉ. पी. एस. माने, डॉ. ए. एम. गाडेकर आदी उपस्थित होते.

**शाळा, महाविद्यालयांमध्ये व्याख्यानांसह विविध स्पर्धांचे आयोजन, व्याख्यात्यांकडून वैचारिक प्रबोधन**



श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात अण्णा भाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

## कोरेगाव येथे जिल्हा परिषद शाळेत अभिवादन

तालुक्यातील कोरेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी शालेय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा मुख्याध्यापक श्रीनिवास पवार, प्रवीण स्वामी, अशोक बिराजदार, लक्ष्मी वाघमारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना महापुरुषांच्या जीवन कार्याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची माहिती दिली. कार्यक्रमास शालेय समितीचे सदस्य, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित

## अणदूरला लहुजी शक्ती सेनेच्या वतीने अभिवादन

## परंडा पोलिस ठाण्यात अण्णाभाऊंचे प्रतिमापूजन

**दैनिक दिव्य मराठी : ०४/०८/२०१८**

**वसा स्वच्छतेचा** | उमरगा येथील शिवाजी महाविद्यालयात रासेयोच्या वतीने शहरात स्वच्छता अभियान

# विद्यार्थी, शिक्षकांनी घेतली स्वच्छतेची शपथ

प्रतिनिधी । उमरगा

मानवी जीवन सर्वांग सुंदर आणि निरोगी बनवायचे असेल तर केवळ पैसा महत्त्वाचा नाही, त्यासाठी आवश्यकता आहे ती स्वच्छतेची. स्वच्छता ही मानवाला ईश्वराच्या जवळ घेऊन जाते. राष्ट्रहितासाठी युवकांनी स्वच्छतेचा वसा घेऊन नवनिर्मितीसाठी सज्ज व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. घनशाम जाधव यांनी केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने एक ऑगस्टपासून शहर व महाविद्यालय परिसराची स्वच्छता करण्यात येत असून स्वच्छ भारत अभियानांतर्गत १५ ऑगस्टपर्यंत करण्यात येणाऱ्या विविध कामांनिमित्त सोमवारी घेण्यात आलेल्या नियोजन बैठकीत प्राचार्य डॉ. घनशाम जाधव बोलत होते. प्रारंभी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी स्वच्छता शपथ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांना दिली. यावेळी उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे, बी. एन. गायकवाड, प्रा. आर. एम. सूर्यवंशी, डॉ. एम. एस. निर्मळे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. अनिल पाटील, प्रा. मुरलीधर जाधव यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना, एनसीसी, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



छत्रपती शिवाजी महाविद्यालयात प्राध्यापक, विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

## स्वच्छतेमुळे प्रतिमा उंचावण्यास मदत

उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले व प्रा. धनाजी थोरे यांनी विद्यार्थी व रासेयोच्या छात्रांना मार्गदर्शन केले. प्रा. धनाजी थोरे म्हणाले की, स्वच्छतेमुळे आपली वेगळी ओळख निर्माण होते. युवा स्वच्छतादूताने शाळा, महाविद्यालय, आणि परिसराची स्वच्छता ठेवून जागृती केल्यास पर्यायाने गावाची, देशाची प्रतिमा उंचावण्यासाठी मदत होईल.

**दैनिक दिव्य मराठी :०८/०८/२०१८**

सकाळ





उमरगा : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शुक्रवारी विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. (दुसऱ्या छायाचित्रात) प्राथमिक आरोग्य केंद्र व महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा करण्यात आला.

# राष्ट्रीय जंतनाशक दिनाचा कार्यक्रम

उमरगा, ता. १२ (बातमीदार) : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने शुक्रवारी (ता. दहा) आंतरराष्ट्रीय आदिवासी दिवस व राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. आर. एम. सूर्यवंशी व प्रा. एस. डी. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयातील एस. टी. प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे, तसेच प्राध्यापकांचे अभिनंदन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र व महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या दर्शनी भागात भित्तीपत्रक लावून जनजागृती करण्यात आली. या वेळी प्रा. आर. एम. सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. पी. डी. पाटील, डॉ. व्ही. एस. सूर्यवंशी, डॉ. एस. पी. परसरकल्ले, डॉ. डी. बी. ढोबळे, डॉ. डी. एस. बिराजदार, प्रा. एस. आर. चव्हाण, डॉ. ए. एम. गाडेकर, डॉ. ए. डी. देशमुख, डॉ. डी. एस. इटले, डॉ. एस. एन. मुच्छटे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

Aurangabad, Osmanabad-Today
13/08/2018 Page No. 2

**दैनिक सकाळ :१२/०८/२०१८**

## शिवाजी महाविद्यालयाच्या रासेयोकडून आदिवासी दिन साजरा



उमरगा । शहरातील छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शुक्रवारी (दि.१०) आंतरराष्ट्रीय आदिवासी दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील अनुसूचित जमाती प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा राष्ट्रीय सेवा योजनाचे डॉ. विनोद देवरकर, कार्यक्रमाधिकारी प्रा. आर. एम. सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त महाविद्यालयाच्या दर्शनी भागात जंतनाशक गोळ्या व माहितीच्या भित्ती पत्रक लावून विविध कृमींमुळे होणाऱ्या आजारांची माहिती डॉ. विनोद देवरकर यांनी विद्यार्थ्यांना दिली. यावेळी प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. पी. डी. पाटील, डॉ. व्ही. एस. सूर्यवंशी, डॉ. एस. पी. परसरकल्ले, डॉ. डी. बी. ढोबळे, डॉ. डी. एस. बिराजदार, प्रा. एस. आर. चव्हाण, डॉ. ए. एम. गाडेकर, डॉ. ए. डी. देशमुख, डॉ. डी. एस. इटले, डॉ. एस. एन. मुच्छटे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

**दैनिक दिव्य मराठी : १२/०८/२०१८**



## परिसराचा विकास शिक्षणावर अवलंबून असतो : डॉ. रमेश दापके

उमरगा । शिक्षण हे समाजविकासाचे माध्यम आहे. एखाद्या परिसराचा विकास हा त्या परिसरात उपलब्ध शिक्षणावर अवलंबून असतो. विद्यापीठही परिसरातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासाचे माध्यम आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली असली तरी शिक्षणाचा प्रवेश दर, गुणवत्ता याबाबतीत इतर देशांच्या तुलनेत आपण पिछाडीवर आहोत, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उपकेंद्राचे माजी संचालक डॉ. रमेश दापके यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाविद्यालयात गुरुवारी (दि.२३) कार्यक्रमात डॉ. रमेश दापके बोलत होते. प्राचार्य डॉ. घनशाम जाधव अध्यक्षस्थानी होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ. डी. व्ही. थोरे आदींची यावेळी उपस्थिती होती. डॉ. रमेश दापके पुढे म्हणाले की, १९५८ मध्ये मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. गेल्या ६० वर्षांत मराठवाड्याच्या विकासात उच्च शिक्षणाचे सर्वाधिक योगदान काय, विद्यापीठाची भूमिका काय आहे, उच्च शिक्षणाची दशा आणि दिशा यावर विचारमंथन करणे व बदलांचा स्वीकार करून आव्हानांना सामोरे जाणे विद्यापीठ वर्धापन दिनाच्या निमित्ताने गरजेचे आहे. सद्यस्थितीत शिक्षणाची दिशा गोंधळलेली असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

**दैनिक दिव्य मराठी : २४/०८/२०१८**

पुढारी

# उमरग्यातील महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापन दिन साजरा

**उमरगा : प्रतिनिधी**

शिक्षण हे समाज विकासाचे माध्यम आहे. कोणत्याही परिसराचा विकास हा त्या परिसरातील उपलब्ध शिक्षण व्यवस्थेवर अवलंबून असतो. विद्यापीठं ही त्या परिसरातील सामाजिक-आर्थिक, शैक्षणिक-राजकीय विकासाचे माध्यम व प्रतिनिधी म्हणून कार्य करतात, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उस्मानाबाद उपपरिसराचे माजी संचालक, प्राचार्य डॉ. रमेश दापके यांनी केले.

शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना डॉ. दापके बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनशाम जाधव होते.

यावेळी उपप्राचार्य डॉ. व्ही. एस. इंगळे, प्रा. धनराज थोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने गेली साठ वर्षे उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. संलग्नित महाविद्यालये, प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी यांची संख्यात्मकवाढहोवूनही उच्चशिक्षणाचा प्रवेश दर, गुणवत्ता याबाबतीत आपण विकसित देशांच्या तुलनेत पिछाडीवर असल्याचे स्पष्ट करीत विद्यापीठाच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त रोजगारक्षम व गुणवत्तेचे शिक्षण देणारी व्यवस्था शासनाने करावी.

जर विद्यापीठाचे प्रशासन कार्यक्षम असेल तर विद्यापीठ ही सामाजिक-आर्थिक व राजकीय विकासाची केंद्रं ठरतील, असा शेवटी आशावाद व्यक्त केला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनशाम जाधव यांचेही भाषण झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. डॉ. संजय अस्वले, तर आभार प्रा. डॉ. विनोद देवरकर यांनी मानले.

My Solapur Edition
27 Aug, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

**दैनिक पुढारी : २७/०८/२०१८**

सकाळ

# कौशल्य विकास कार्यशाळेतून मार्गदर्शन

**उमरगा, ता. २४ (बातमीदार)** : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय व रोटरी क्लब उमरगातर्फे गुरुवारी (ता. २३) एक दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळा घेण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना व रोटरी क्लब एकत्र आल्यास सामाजिक कार्यात फार मोठा बदल घडू शकतो, असे मत रोटरी क्लबचे अध्यक्ष संतराम मुरजानी आणि सचिव डॉ. धनंजय मेनकुदळे यांनी व्यक्त केले. डिस्ट्रिक्ट लिटरसी डायरेक्टर डॉ. संजय अस्वले, कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर उपस्थित होते.



**उमरगा : मार्गदर्शन करताना संतराम मुरजानी. यावेळी प्रा. डॉ. संजय अस्वले, प्रा. डॉ. धनंजय मेनकुदळे, प्रा. डॉ. विनोद देवरकर.**

Aurangabad, Osmanabad-Today
25/08/2018 Page No. 4

**दैनिक सकाळ :२५/०८/२०१८**

# रासेयो स्वयंसेवकांनी दिला पूरग्रस्तासाठी निधी

**पुण्य नगरी** । वृत्तसेवा

**उमरगा-लोहारा:** उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी गुरुवारी (दि.३०) केरळ पूरग्रस्तांसाठी मदतनिधी पाठवण्यासाठी भव्य रॅलीचे आयोजन केले होते. यातून जमा झालेला निधी हा थेट केरळच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा केला जाणार असल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. संजय अस्वले, बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी. तडोळगे, डॉ. एम. एस. निर्मळे, श्रीमती डॉ. ए. एस. शिंदे, डॉ. विनोद देवरकर, प्रा. राजेंद्र सुर्यवंशी, प्रा. व्हनाळे, अमर सुर्यवंशी, महादू शानमे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे यांच्यासह विद्यार्थ्यांनी शहरात फेरी मारुन निधीचे संकलन केले. सदरील निधी केरळच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जमा होणार आहे.



■ **उमरगा..** येथे विद्यार्थ्यांनी पूरग्रस्तांसाठी निधी संकलन केले.

**दैनिक पुण्यनगरी : ०१/०९/२०१८**

**अभिव्यक्ती** उमरग्यात श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात स्वयंशासन दिनी वाङ्मय मंडळाने राबवला उपक्रम

# शिक्षकांच्या कविसंमेलनाने शिक्षक दिन साजरा

प्रतिनिधी । उमरगा

येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयक्यूएसी, राष्ट्रीय सेवा योजना वाङ्मय मंडळाच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.५) शिक्षक दिनानिमित्त स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला. दरम्यान विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे कविसंमेलन हा अभिनव कार्यक्रम राबवून या काव्य मैफलीत प्रथमच प्राध्यापकांनी सहभाग घेऊन त्यांच्या काव्य मनाला चालना दिली.

शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या जीवनाचा शिल्पकार असतो. एरवी वर्षभर शालेय अभ्यासक्रमाच्या चाकोरीत शिकवताना स्वतःच्या कलागुणांचा विसर शिक्षकांना पडणे साहजिक आहे. याच बाबींचा विचार करून राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शिक्षकांना व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. या उपक्रमातून शिक्षकांनी आनंद घेतला. शिक्षकांच्या कार्याचा गौरव करतच कवितेच्या माध्यमातून व्यक्त होतानाच आम्हाला मार्गदर्शनही करावे, असे आवाहन विद्यार्थी संसद सचिव अमर सूर्यवंशी यांनी केले. शिक्षक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्वयंशासन दिनी वाङ्मय मंडळाने हा उपक्रम राबवल्याबद्दल अभिनंदन केले व भविष्यात यापुढे जाऊन साहित्यनिर्मिती करावी, असे आवाहन उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे यांनी यावेळी केले.

यावेळी प्राध्यापक, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी विनोद देवरकर, राजेंद्र सूर्यवंशी, डी. डी. पांढरे, एस. डी. शिंदे, एम. एस. निर्मळे यांच्यासोबतच स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक्षा पाटील यांनी केले. अमर सूर्यवंशी यांनी आभार मानले.



श्री छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली.

## आईची महती सांगणाऱ्या कवितेने संमेलनाची सुरुवात

संमेलनाध्यक्ष प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी आईची महती सांगणारी कविता सादर करून संमेलनाची सुरवात केली. डॉ. चंद्रकांत पवार, डॉ. अनिल गाडेकर, डॉ. विनोद देवरकर, डॉ. पद्माकर पिटले, डॉ. एस. टी. तोडकर, प्रा. दत्ता माने, प्रा. पी. एस. बनसोडे, प्रा. व्ही. टी. जगताप, प्रा. अंकुश गायकवाड आदींनी एकाहून एक सरस कविता सादर केल्या. या माध्यमातून दररोज अध्यापनाचे कार्य करणाऱ्या प्राध्यापकांनी कलागुणांना चालना दिली.

**दैनिक दिव्य मराठी :०७/०९/२०१८**

## रासेयो स्वयंसेवकांनी दिला केरळ आपदग्रस्तांना निधी



उमरगा /प्रतिनिधी

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी दि ३० रोजी केरळ राज्यातील पूरग्रस्तांसाठी मदत निधी पाठवण्यासाठी भव्य रॅली चे आयोजन केले होते.यातून जमा झालेला निधी हा थेट केरळच्या मुख्यमंत्री राहत कोश मध्ये जमा केला जाणार आहे.

नैसर्गिक आपदा ही कुठेही, कधीही येऊ शकते. अश्यावेळी मानवतेच्या दृष्टीकोनातून पीडितांना मदतीचा हात आपण दिला पाहिजे. त्यांच्या दुखात आपण सहभागी होऊ शकत नाही पण त्यांच्या उध्वस्त झालेल्या कुटुंबाला उभारणी देण्यासाठी आपली अगदी छोटीशी मदतही खूप मोठे योगदान ठरणार आहे. म्हणून आपण सर्वांनी साधाल हाताने मदत करावी असे आवाहन प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जमेल तेवढे पैसे निधी साठी दिलेत. यावेळी उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी. तडोळगे, डॉ.एम.एस.निर्मळे, डॉ.ए.एस. शिंदे, डॉ विनोद देवरकर, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. व्हनाळे, अमर सूर्यवंशी, महादू शानमे, प्रा. व्हनाळे आदिंनी निधी पेटीमध्ये मदत टाकून रॅलीची सुरवात केली. मदतीचा हात, केरळला साथ, सेल्फी नको, मदत द्या, मदत करा, मदत करा.. पूरग्रस्तांना मदत करा या रासेयो स्वयंसेवकांनी केलेल्या आवाहनाने आसमंत दुमदुमला. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. एम.एस.निर्मळे, प्रा. सुजित शिंदे, प्रा.डी.डी.पांढरे यांनी परिश्रम घेतले.

पुढारी

## रासेयोच्या वर्धापनदिनानिमित्त शिवाजी महाविद्यालयात कार्यक्रम

उमरगा : शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात सोमवारी दि. २४ रोजी रासेयो वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी. तडोळगे हे उपस्थित होते. डॉ. विनोद देवरकर म्हणाले, की राष्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारचा स्थायी उपक्रम असून महाविद्यालये, शाळांतून तो राबवला जातो. विद्यार्थ्यांना सामाजिक भान, समाजसेवा, नेतृत्व गुणासाठी हा उपक्रम महत्त्वाची भूमिका पार पाडतो. तर प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी बदलते वातावरण, जागतिक लोकसंख्या वाढ, नवनवीन आजारांचे थैमान या धर्तीवर भारत सरकारने सुरू केलेल्या 'स्वच्छता ही सेवा' उपक्रमाचे महत्त्व सांगितले. जेथे स्वच्छता असते तेथे आरोग्य नांदते, म्हणून 'स्वच्छ हो भारत' ही संकल्पना कृतीतून प्रत्यक्षात उतरविण्याचे आवाहन केले. यावेळी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. एम. एस. निर्मळे, प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी डी पांढरे यांच्यासह रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

Beed Edition
26 Sep, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

**साप्ताहिक न्यूज सिक्सर : ०३/०९/२०१८**

## ग्रामिण–२०१८ क्षेत्रकार्यशाळेस उदंड प्रतिसाद!



उमरगा/प्रतिनिधी

भारत सरकारच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत, ग्रामिण स्वच्छता डिजिटल सर्वेक्षण स्वच्छ सर्वेक्षण ग्रामिण -१८ (एस एस जी १८) या एंड्रॉइड एप च्या माध्यमातून ऑनलाइन सर्वेक्षण देशभरात करत आहे. महाविद्यालयात शिकत असलेला विद्यार्थी हा त्याच्या गावाचे प्रतिनिधित्व करत असून तो समजदार, सुशिक्षित आहे. त्याचे मत तो कोणत्याही दबावाला बळी न पडता मोबाइल च्या माध्यमातून स्वतंत्रपणे नोंदवू शकतो असे मत यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी एच जाधव यांनी व्यक्त केले. क्षेत्र सर्वेक्षण कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय व जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३१/०८/२०१८ रोजी आयोजित स्वच्छ सर्वेक्षण ग्रामिण -१८ (SSG-१८) क्षेत्र कार्यशाळेस राष्ट्रिय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी जिल्हा परिषदेच्या वतीने श्री ऋषिकेश डुमने यांनी SSG-१८ ऐप कसे वापरायचे व सर्वेक्षणात आपला सहभाग कैसा नोंदवायचा याचे प्रशिक्षण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दिले व त्यांच्याकडून सर्वेक्षण पूर्ण करुन घेतले.

यावेळी जवळपास ३५० प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व रासेयो स्वयंसेवकांनी आपला सहभाग या सर्वेक्षणात नोंदवला. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ विनोद देवरकर, प्रा राजेंद्र सूर्यवंशी, डॉ एम एस निर्मळे, प्रा डी डी पांढरे व स्वयंसवकांनी अथक परिश्रम घेतले.

आदर्श गावकरी

# शिवाजी महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त स्वयंशासन दिन साजरा



**उमरगा / प्रतिनिधी**

शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयक्यूएसी, राष्ट्रीय सेवा योजना व वाङमय मंडळातर्फे बुधवारी (दि.५) शिक्षक दिनानिमित्त स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी 'शिक्षकांचे [illegible] राबवला. या संमेलनात दहा प्रध्यापकांनी सहभाग नोंदवला.

संमेलनाध्यक्ष प्राचार्य धनश्याम जाधव यांनी आईची महती गाणारी कविता सदर करुन संमेलनाची सुरवात केली. डॉ. चंद्रकांत पवार, डॉ.अनिल गाडेकर, डॉ.विनोद देवरकर, डॉ. [illegible] प्रा.दत्ता माने, प्रा.बनसोडे, प्रा.जगताप, प्रा. गायकवाड, आदींनी कविता सादर केल्या. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.थोरे, विनोद देवरकर, राजेंद्र सूर्यवंशी, पांढरे, शिंदे, निर्मळे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक अमर सूर्यवंशी, सुत्रसंचालन प्रतिक्षा पाटील तर [illegible]

Nanded Edition
7 Sep, 2018 Page No. 8
Powered by : erelego.com

**दैनिक आदर्श गावकरी : ०७/०९/२०१८**

सकाळ

# शिवाजी महाविद्यालयात वर्धापन दिनाचा कार्यक्रम

उमरगा, ता. ३० (बातमीदार) : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात सोमवारी (ता. २४) राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन व स्वच्छ भारत उपक्रमानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय सेवा योजनेचा ध्वज फडकाविण्यात आला. योजनेचे लाखो स्वयंसेवक स्वच्छता अभियानात सहभागी होतील, असा विश्वास कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी व्यक्त केला.

उपप्राचार्य डॉ. [illegible] [illegible], उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा. थोरे, उपप्राचार्य गायकवाड, पर्यवेक्षक [illegible], सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. निर्मळे, प्रा. सुजित शिंदे, प्रा. पांढरे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.



उमरगा : छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वर्धापन दिनानिमित्त प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले.

Aurangabad, Osmanabad-Today
01/10/2018 Page No. 3

**दैनिक सकाळ :०१/१०/२०१८**

सकाळ

# जिल्हाभरात शिक्षक दिन, स्वयंशासन दिनाचे कार्यक्रम

**उस्मानाबाद :** जिल्हातील विविध शाळांमध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन व स्वयंशासन दिन म्हणून साजरा करण्यात आला. या वेळी मान्यवरांनी डॉ. राधाकृष्णन यांना अभिवादन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेत या दिवशी शाळेचा कारभार चालविला. या वेळी विद्यार्थ्यांनी गुरुजनांचा सत्कारदेखील केला.



उमरगा : महात्मा गांधी विद्यालय.



कवडेवाडी, (ता. वाशी) : केंद्रीय प्राथमिक शाळा.



श्री श्री रविशंकर विद्यालय.



बलसूर (ता. उमरगा) : छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय.



उमरगा : आदर्श विद्यालय.



उमरगा : छत्रपती शिवाजी महाविद्यालय.

**दैनिक सकाळ : ०८/०९/२०१८**

**उमरगा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी आयोजित केले प्राध्यापकांचे काव्य संम्मेलन.** https://youtu.be/9-ckFF5o_5c

सकाळ

# 'रायला' उपक्रमातून करिअर मार्गदर्शन

उमरगा, ता. १४ (बातमीदार) : रोटरी क्लबच्या वतीने बुधवारी (ता. १२) रोटरी यूथ लीडरशिप अॅवॉर्ड (रायला) उपक्रम घेण्यात आला. यामध्ये उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांना करिअर कसे ठरवावे, ध्येयपूर्तीसाठी आवश्यक कौशल्ये कोणती हे प्रात्यक्षिकांसह स्पष्ट केले.

ते म्हणाले, यशप्राप्तीसाठी पालक आणि पाल्य दोघेही सजग झालेले दिसतात; परंतु नेमके यश कसे मिळवावे याचा मार्ग सापडत नसल्याने त्यांना अपेक्षित यशापासून दूर राहावे लागते.

दुसऱ्या सत्रात माजी प्राचार्य डॉ. दीपक पोफळे यांनी संभाषण कौशल्याचा मंत्र दिला. रोटरी क्लबचे अध्यक्ष संतराम मुरजानी यांनी या उपक्रमाची माहिती सांगितली. यावेळी शरणाप्पा मलंग विद्यालय व श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यशाळेसाठी प्रकल्प संचालक डॉ. विनोद देवरकर यांनी पुढाकार घेतला.

रोटरी क्लबचे सचिव डॉ. धनंजय मेनकुदळे यांनी प्रास्ताविक केले. परमेश्वर सुतार यांनी सूत्रसंचालन केले. प्रवीण स्वामी यांनी आभार मानले.



उमरगा : रोटरी क्लबच्या रायला उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना करिअर निवडीविषयी मार्गदर्शन करताना डॉ. संजय अस्वले.

Aurangabad Osmanabad-Today
15/09/2018 Page No. 4

**दैनिक सकाळ: १५/०९/२०१८**

## रोटरी क्लबकडून विद्यार्थ्यांना यश प्राप्तीबाबत मार्गदर्शन

प्रतिनिधी । उमरगा

रोटरी क्लबच्या वतीने रोटरी युथ लीडरशिप अवार्ड (रायला) हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना 'यश प्राप्ती कशी करावी' या बाबतीत मार्गदर्शन केले जाते. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून रोटरी लिटरसीचे जिल्हा संचालक डॉ. संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांना करिअर कसे ठरवावे व त्यासाठी ध्येय निश्चय करावी याबाबत मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात डॉ. दीपक पोफळे यानी नवनवीन बदलांचे स्वागत करावे, त्याना सामोरे जावे, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन केले. यावेळी शरणाप्पा मलंग विद्यालयाचे, छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परमेश्वर सुतार तर आभार प्रवीण स्वामी यांनी मानले.

**दैनिक दिव्य मराठी :१८/०९/२०१८**

## रासेयो स्वयंसेवकांनी केली रस्ते, गटारींची स्वच्छता

प्रतिनिधी | उमरगा

शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महात्मा गांधी जयंतीनिमित्त शहरातील विविध भागात स्वच्छता फेरी काढून रस्ते, नाला, गटारींची स्वच्छता करून नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व सांगण्यात आले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव यांनी प्रतिमापूजन करून स्वच्छता फेरीला हिरवा झेंडा दाखवला.

सुरुवातीला स्वयंसेवकांनी महाविद्यालय आणि परिसरात स्वच्छता ठेवण्याचे महत्त्व पत्रिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्यानंतर काळे प्लॉट भागातील परिसरात स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांना आपला परिसर, घर व सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. त्यानंतर विविध विभागांची व परिसरातील रस्ते, गटारी यासह सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. यावेळी उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा. भनाजी थोरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. एम. एस. निमंळे, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे यांच्यासह स्वयंसेवक उपस्थित होते.



उमरग्यात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

**दैनिक दिव्य मराठी :०५/१०/२०१८**



# रासेयो स्वयंसेवकांनी दिला स्वच्छतेचा संदेश

उमरगा / प्रतिनिधी

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित रासेयो स्वयंसेवकांनी उमरगा येथे काळे प्लाट परिसरात स्वच्छता फेरी काढली. तसेच रस्ते, नाला, परिसर साफसफाई करून नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मंगळवारी (दि.२) गांधी जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एच.जाधव यांनी गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करुन स्वच्छता फेरीला हिरवा झेंडा दाखवला. स्वयंसेवकांनी स्वच्छता ठेवण्याचे महत्त्व छापील पत्रिकांच्या माध्यमातून समजावून सांगण्यासाठी घरोघरी भेट दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा.धनाजी थोरे, कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ.एम.एस.निर्मळे, प्रा.राजेंद्र सूर्यवंशी, प्रा.सुजित शिंदे, स्वयंसेवक उपस्थित होते.

**आदर्श गावकरी : ०३/१०/२०१८**

सकाळ

## छत्रपती शिवाजी महाविद्यालयात कार्यक्रम

उमरगा, ता. १ : शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने शनिवारी (ता. २९) सर्जिकल स्ट्राईक दिवस साजरा करण्यात आला. कॅप्टन सूर्यकांत जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव अध्यक्षस्थानी होते. माजी सैनिक खंडू दुधभाते यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. जाधव यांनी अभ्यास दौऱ्यादरम्यान आलेले त्यांचे अनुभव कथन करीत त्यांच्या कार्याचा गौरव केला. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एम. एस. निर्मळे यांनी आभार मानले. या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे यांच्यासह स्वयंसेवक उपस्थित होते.

Aurangabad, Osmanabad-Today
02/10/2018 Page No. 1

**दैनिक सकाळ :०२/१०/२०१८**



उमरगा येथे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात रासेयो विभागाच्या वतीने राष्ट्रीय एकता दिन साजरा करण्यात आला.

## उमरग्यात श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिन साजरा

उमरगा । शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने बुधवारी (दि.३१) सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य डी. व्ही. थोरे, डॉ विलास इंगळे, डॉ. देवरकर उपस्थित होते. प्रारंभी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या उपस्थित पूजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रा. आर. एम. सूर्यवंशी, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. एस. टी. दाडगे यांनी पुढाकार घेतला. उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाधिकारी डॉ. एम. एस. निर्मळे यांनी आभार मानले.

**दैनिक दिव्य मराठी : ३१/१०/२०१८**

सकाळ



उमरगा : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन करण्यात आले.

# वाचन उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## जिल्हाभरात वाचन प्रेरणा दिन साजरा, स्वामी विवेकानंद वाचनालयात ग्रंथप्रदर्शन

सकाळ वृत्तसेवा

**उस्मानाबाद, ता. २० :** शहरासह जिल्हाभरात माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. शाळा, महाविद्यालयांत घेण्यात आलेल्या वाचन उपक्रमात विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध पुस्तकांचे वाचन केले.

**भोसले हायस्कूल**

उस्मानाबाद येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये कार्यक्रम घेण्यात आला. प्राचार्य एस. एस. पडवळ, उपमुख्याध्यापक सिद्धेश्वर कोळी, पर्यवेक्षक ए. व्ही. सुरवसे, सांस्कृतिक विभागप्रमुख एन. एन. हाजगुडे, व्ही. के. इंगळे यांच्यासह शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.

**रामकृष्ण परमहंस महाविद्यालय**

येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील एनएसएस, एनसीसी व मराठी विभागातर्फे कार्यक्रम घेण्यात आला. प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थी, शिक्षकांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या पुस्तकाचे सामुदायिक वाचन केले. ग्रंथालय विभागाने पुस्तके उपलब्ध केली होती. प्रा. एस. जी. नागरगोजे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. इंदलकर, प्रा. क्षीरसागर, डॉ. विकास सरनाईक, डॉ. विलास गुंड पाटील, प्रा. राजा जगताप यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. डॉ. केशव क्षीरसागर यांनी आभार मानले.



एकुरगा (ता. उमरगा) : येथील श्री शिवशक्ती विद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

**तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यक्रम झाला. माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. एन. एस. बिरादार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. यादव, प्रा. तुरुप, प्रा. सुनीता गुंजाळ, प्रा. योगिता अजमेरा, सक्षणा टेकाळे यांची उपस्थिती होती. या वेळी विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देण्यात आले. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रा. बालाजी चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

**श्री शिवशक्ती विद्यालय**

**वलसूर :** येथील श्री शिवशक्ती विद्यालयात कार्यक्रम झाला. मुख्याध्यापक प्रकाश बोंडगे यांच्या हस्ते डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी विजयाताई गायकवाड, धनराज पाटील, अजित सोळुंके, सिद्धेश्वर वाकडे, महादेव करके, सोमनाथ म्हेत्रे, म्हाळाप्पा कोकरे, राजेंद्र सगर यांची उपस्थिती होती. अजित सोळुंके यांनी सूत्रसंचालन केले, तर आभार कोकरे यांनी मानले.

**श्री माधवराव पाटील महाविद्यालय**

**मुरूम :** येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. डॉ. सायबण्णा घोडके, प्रा. सुधीर पंचगल्ले, प्रा. राजकुमार वाकडे, डॉ. शीला स्वामी, डॉ. जयश्री सोमवंशी, डॉ. संध्या डांगे, डॉ. रमाकांत पाटील, प्रा. दयानंद बिराजदार यांची उपस्थिती होती. प्रा. डॉ. महेश मोटे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद घेण्यात आला. प्रा. डॉ. शिवपुत्र कनाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. सोमनाथ बिराजदार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. गोपाळ कुलकर्णी यांनी केले. प्रा. नागनाथ बनसोडे यांनी मानले.

**स्वामी विवेकानंद वाचनालय**

**कळंब :** तालुक्यातील आंदोरा येथील स्वामी विवेकानंद वाचनालयात ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले होते. उद्घाटन वाचनालयाचे अध्यक्ष दादासाहेब फरताडे यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन अशोक तामाणे यांच्या हस्ते करण्यात आले. या ग्रंथप्रदर्शनात एक हजार ग्रंथ ठेवण्यात आले होते. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व लोकमान्य विद्यालयातील विद्यार्थ्यांसह शिक्षक व वाचकांनीही या प्रदर्शनास भेट देऊन आवडीच्या ग्रंथाचे वाचन केले. ग्रंथपाल अशोक तांबारे, भैया तांबारे, दिनेश शेरखाने, हरिभाऊ तांबारे आदींनी पुढाकार घेतला.

**शिवाजी महाविद्यालय**

**उमरगा :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व वाङ्मय मंडळाच्या संयुक्त विद्यमाने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. डॉ. पद्माकर पिटले यांची प्रमुख उपस्थिती होती. उपप्राचार्य प्रा. थोरे अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. जाधव, उपप्राचार्य डॉ. इंगळे व गायकवाड, पर्यवेक्षक तडोळगे, हिंदी विभागप्रमुख डॉ. खराडे, वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. निर्मळे, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे, प्रा. पांढरे आदींची उपस्थिती होती. डॉ. देवरकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. पसरकल्ले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. खराडे यांनी आभार मानले.

Aurangabad, Osmanabad-Today
21/10/2018 Page No. 3

**दैनिक सकाळ : २१/१०/२०१८**

# ग्रंथालये ही वाचनालये व्हावीत - डॉ. पद्माकर पिटले



उमरगा/प्रतिनिधी

ग्रंथालये हि वाचकांअभावी स्मशानव्रत झाली आहेत. त्यांच्या अंत्ययात्रेचे साक्षिदार होण्यापेक्षा त्याला आनंदयात्रेचे स्वरूप कसे आणता येईल यावर विचार झाला पाहिजे. ग्रंथालयातील पुस्तके धूळ खात न पडू देता वाचकांपर्यंत कशी पोहचवावीत जेणेकरून ग्रंथालये हि वाचनालयांमध्ये परावर्तीत होतील. यावर विचारमंथन होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन प्रमुख वक्ते डॉ. पद्माकर पिटले यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्ते आयोजित व्याख्यानात केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात दि १५ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व वाङ्मय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ते वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. कलाम यांचा वाढदिवस हा वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जावा अशी त्यांची इच्छा होती. ज्ञानाने मनुष्य समृद्ध व प्रगल्भ होतो. त्याकरिता प्राध्यापक, विद्यार्थी, व सर्व शिक्षित जनामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी. समृद्ध ग्रंथालयातील पुस्तके वाचकांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत पोहचली पाहिजेत म्हणून हा वाचन प्रेरणा दिन साजरा केला गेला. आपण कुठल्या जातीत जन्मलो त्यापेक्षा ज्ञानाच्या बळावर आपण कुठे पोहचलो हे महत्वाचे. वेगवेगळ्या जातीत जन्मूनही अनेक साहित्यिकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडवून शेवटी पुस्तकांसोबतच या जगाचा निरोप घेतला असेही मत डॉ. पिटले यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य, प्रा. डी. व्ही. थोरे म्हणाले कि, सुजलाम सुफलाम संस्कृती असणाऱ्या आपल्या देशामध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याची वेळ यावी ही बाब भावी पिढीसाठी चिंताजनक आहे. त्यामुळे आपण सर्वांनी एकविसाव्या शतकामध्ये पुस्तकांबरोबरच माणसंही वाचायला शिकली पाहिजेत. जेणेकरून येणाऱ्या पिढीसाठी आपण मजबूत पायाभरणी केली जाईल. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, उपप्राचार्य डॉ. व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी. तडोळगे, हिंदी विभागप्रमुख डॉ. आर. एम. खराडे, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख व रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. एम. एस. निर्मळे, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, सर्व विभागांचे विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विनोद देवरकर, सूत्र संचलन प्रा. एस. पी. पसरकल्ले, तर आभार डॉ. आर. एम. खराडे यांनी मानले.

# हस्तलिखित पत्रिका व्यक्त होण्याचे सर्वांगसुंदर माध्यम - डॉ. जी. एच. जाधव



उमरगा/प्रतिनिधी

हस्ताक्षर हे मन व स्वभाव उलगडण्याचे तसेच व्यक्त होण्याचे सशक्त माध्यम असून तंत्रज्ञानाच्या या युगात ही कला लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. सुंदर हस्ताक्षरात लिहलेली पत्रे आजही अनेकांनी आठवणींचा ठेवा म्हणून जतन केलेली आहेत. माहितीच्या आंतजालामुळे सहज उपलब्ध होणारे संदेश, जसेच्या तसे एकमेकांना पाठवले जातात त्यामुळे स्वलेखन कला संपुष्टात येते कि काय? हा प्रश्न अभ्यासकांना पडतो आहे. या पार्श्वभूमीवर हस्तलिखित भित्तीपत्रिका उपक्रमाचे अनन्यसाधारण महत्व आहे असे मत डॉ. जी. एच. जाधव यांनी अनावरण प्रसंगी व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आज दि १४ रोजी वाङ.मय मंडळाच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये वाचन व लिखाणाची आवड निर्माण व्हावी, त्यांना व्यक्त होण्यास व्यासपीठ मिळावे म्हणून हस्तलिखित भित्तीपत्रक या उपक्रमाची सुरवात करण्यात आली. वाङ.मय मंडळाचे अध्यक्ष प्रा. एस. व्ही. बहिरव व सदस्य यांनी विद्यार्थी संपादकांना मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना लिहिते केले. विद्यार्थी संपादक म्हणून श्री संतोष कांबळे, कु. संध्या पत्रोळे, कु. मेघा पुजारी, कु. पल्लवी गायकवाड व श्री मारुती होगाडे यांनी काम पहिले.

भित्तीपत्रक अनावरण प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी. तडोळगे, मराठी विभागप्रमुख डॉ. पद्माकर पिटले, हिंदी विभागप्रमुख डॉ. आर. एम. खराडे, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. विनोद देवरकर, प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. चंद्रकांत पवार, प्रा. जीवन जाधव, डॉ. सन्मुख मुच्छटे, आदि उपस्थित होते.



उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात संविधान दिवस साजरा करण्यात आला.

## उमरगा : शिवाजी महाविद्यालयात कार्यक्रम

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्यावतीने सोमवारी (दि.२६) संविधान दिवस साजरा करण्यात आला. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन अमोल मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, विविध विभागांचे प्रमुख, राज्य सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, शिक्षकेतर कर्मचारी व स्वयंसेवक उपस्थित होते. पुढे बोलताना अमोल मोरे म्हणाले की, जगातील सर्वात मोठे हस्तलिखित संविधानाचा मान भारतीय संविधानाला मिळतो, ज्यामध्ये ४८ प्रकरणे असून त्यासाठी दोन वर्ष ११ महिने व १७ दिवसांचा कालावधी लागला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी केले. सूत्रसंचालन उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे यांनी तर आभार प्रा. एस. इ. बिराजदार यांनी मानले.

**दैनिक दिव्य मराठी : २९/११/२०१८**

## शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी केले संविधान वाचन

उमरगा, दि. ३ (प्रतिनिधी) :

जगातल्या सर्व देशांच्या संविधानाचा सखोल अभ्यास करून भारतासारख्या भाषिक वैविध्यता असेलल्या देशाचे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला अर्पण केले. जगातील सर्वात मोठे हस्तलिखित संविधानाचा मान भारतीय संविधानाला मिळतो. अशा संविधानाची विद्यार्थ्यांना आ- ळख व्हावी त्यासाठी संविधानाच्या मूलभूत तत्त्वांचे प्रकट वाचन प्रा. एस. इ. बिराजदार, राज्यशास्त्र विभागप्रमुख यांनी विद्यार्थ्यांसमवेत केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दरवर्षी संविधान सप्ताह साजरा करण्यात येतो. भारतीय संविधानाची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी यासाठी महाविद्यालयात व तसेच नागरिकांना नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये त्यांना कळावेत यासाठी समाजामध्ये सुद्धा विविध कार्यक्रम या विभागाच्या वतीने घेत- ले जातात त्याचाच एक भाग म्हणून दिनांक डिसेंबर रोजी संविधान वाचन हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव , उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य प्रा. डी. वी. थोरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. बी. एन. गायकवाड, डॉ. अनिल देशमुख, प्रा. दिलीप चव्हाण आदि उपस्थित होते.

**सकाळ**



उमरगा : जागतिक एड्स दिनानिमित्त काढलेल्या जनजागृती फेरीला हिरवा झेंडा दाखविताना अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. बी. साळुंके. यावेळी प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, डॉ. विलास इंगळे, प्रा. धनाजी थोरे, डॉ. संजय अस्वले, डॉ. पी. आर. पुरी, न्यायाधीश एन. के. कांदे, न्यायाधीश यू. पी. कुलकर्णी, श्रीमती. ए. एन. गावंडा, न्यायाधीश आर. एम. नाईकवाडी आदी.

## एड्स दिनानिमित्त जनजागृती फेरी

उमरगा, ता. १ (बातमीदार) : जागतिक एड्स दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, जिल्हा उपरुग्णालय, विधि मंडळ, ताजमहाबजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसी व रोटरी क्लब यांच्या वतीने शनिवारी (ता. एक) शहरातील प्रमुख मार्गावरून फेरी काढण्यात आली. फेरीचा प्रारंभ येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयापासून करण्यात आला. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. बी. साळुंके यांनी फेरीला हिरवा झेंडा दाखविला. श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य प्रा. धनाजी थोरे, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. पी. आर. पुरी, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) एन. के. कांदे, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यू. पी. कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) श्रीमती ए. एन. गावंडा, न्यायाधीश आर. एम. नाईकवाडी, रोटरी क्लबचे अध्यक्ष संग्राम पुजारी, डॉ. अशोक अंजकारी, प्रा. युसुफ मुल्ला, उपजिल्हा रुग्णालयातील एकात्मिक समुपदेशन केंद्राचे समुपदेशक अरुण भालेराव यांची उपस्थिती होती. फेरीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, ताजमहाबजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसीचे विद्यार्थी, एसबीएस विभागाचे विद्यार्थी सहभागी होते. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विनोद देवकर, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. पांडे, डॉ. एम. एस. शिंदे आदींनी पुढाकार घेतला.

Aurangabad, Osmanabad-Today
03/12/2018 Page No. 4

**दैनिक सकाळ: ०२/१२/२०१८**

**आदर्श गावकरी**



## छत्रपती शिवाजी महाविद्यालयात संविधान दिन साजरा

उमरगा / प्रतिनिधी

येथील श्री छत्रपती शिवाजी महावद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागातर्फे सोमवारी संविधान दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन केले गेले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, विविध विभागांचे विभागप्रमुख, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर, कर्मचारी, स्वयंसेवक उपस्थित होते. सूत्रसंचालन उपप्राचार्य प्रा.डी.व्ही.थोरे, आभार राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. एस.इ.बिराजदार यांनी मानले.

Latur Edition
28 Nov, 2018 Page No. 11
Powered by : erelego.com

**दैनिक आदर्श गावकरी: २८/११/२०१८**

सकाळ



उमरगा : दिव्यांग विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, उपप्रचार्य डॉ. संजय अस्वले.

## दिव्यांग विद्यार्थी, कर्मचाऱ्यांचा सत्कार

उमरगा, ता. ४ (बातमीदार) : जागतिक दिव्यांग दिनानिमित्त श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण विभाग व मतदार साक्षर क्लबच्या वतीने सोमवारी (ता. तीन) दिव्यांग विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. 'मी मतदार आहे याचा मला अभिमान आहे' या संदेशासह बॅचेस देऊन प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, उपप्रचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाविद्यालय ग्रंथालय सेवक औरादे, अर्चना कवलगे, मयूरी पवार, श्रुती शिरूरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. केशव लेंगरे, डॉ. अजित आष्टे, प्रा. विजयकुमार मुळे यांची उपस्थिती होती. प्रतीक्षा पाटील यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. अस्वले यांनी सूत्रसंचालन केले.

Aurangabad, Osmanabad-Today
05/12/2018 Page No. 3

**दैनिक सकाळ : ०५/१२/२०१८**

आदर्श गावकरी

## जागतिक एड्स दिनानिमित्त सुरक्षा, संरक्षण रॅली



उमरगा : येथे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, जिल्हा उपरुग्णालय, विधिज्ञ मंडळ, तात्याराजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसी व रोटरी क्लब, उमरगा यांच्यातर्फे जागतिक एड्स दिनानिमित्त शनिवारी रॅली काढण्यात आली. रॅलीचे उद्घाटन जिल्हा न्यायालयाचे वरिष्ठ न्यायाधीश एस.बी.साळुंके यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य प्रा. धनाजी थोरे, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, जिल्हा उपरुग्णालयाचे अधीक्षक डॉ. गणेश पुरी, न्या.एन.के. कारडे, न्या.यु.पी. कुलकर्णी, न्या.ए. एन नावंदर, न्या.आय.एम. नाईकवाडी, संतराम मुरजानी, डॉ. अहंकारी, कुसुम मुद्दा उपस्थित होते. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटनेच्या सहयोगातून तयार झालेल्या 'मला खरे सांगा एच आय व्ही एड्स विषयी' या पत्रिकेद्वारे तसेच विद्यार्थ्यांनी विविध घोषणांच्या, पोस्टरच्या माध्यमातून जनजागृती केली. उपक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विनोद देवरकर, प्रा.राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. एस.डी. शिंदे, प्रा.डी.डी. पांढरे, डॉ.एम एस निर्मळे, प्रा. दिपे, प्रा. कु. भावे, प्रा. श्रीमती जाधव, मंठाळकर आदींनी परिश्रम घेतले.

Latur Edition
2 Dec, 2018 Page No. 11
Powered by : erelego.com

**दैनिक आदर्श गावकरी: ०२/१२/२०१८**

पुढारी

## एड्स दिनानिमित्त उमरग्यात जागृती फेरी

उमरगा : प्रतिनिधी

[illegible]



[illegible]

**दैनिक पुढारी : ०२/१२/२०१८**

सकाळ

## शिवाजी महाविद्यालयात संविधान दिवस

उमरगा : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने सोमवारी (ता.२६) संविधान दिवस साजरा करण्यात आला. भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, प्रा. डॉ. प्रवीण माने, विविध विभागांचे विभागप्रमुख, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. जाधव यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे यांनी सूत्रसंचालन केले. राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. एस. ई. बिराजदार यांनी आभार मानले.

Aurangabad, Osmanabad-Today
29/11/2018 Page No. 3

**दैनिक सकाळ : २९/११/२०१८**

**आयोजन** • ॲड. शुभदा पोतदार यांचे मत, उमरग्यात छत्रपती शिवाजी महाविद्यालयात हक्क व अधिकारावर मार्गदर्शन

# सुसंस्कृत समाजनिर्मितीसाठी सुसंस्कृत विद्यार्थी घडावा

**प्रतिनिधी** | उमरगा

निसर्गाने जन्मजात मानवास जगण्याचा हक्क दिला पण या हक्काबरोबर आपले अधिकार व कर्तव्यांचे पालन करावे. मुलाने आई-वडिलांना, सुनेने सासू-सासऱ्यांना, पतीने-पत्नीला, पत्नीने पतीचे अधिकार व हक्क याचे संरक्षण करावे. असे झाल्यास सुसंस्कृत कुटुंब व सुसंस्कृत समाज घडण्यास मदत होणार होईल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे मत ॲड. शुभदा पोतदार यांनी व्यक्त केले.

शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त कायदेशीर अधिकार व हक्क यावर ॲड. शुभदा पोतदार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे समन्वयक उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ. व्ही. एस इंगळे, प्रा. डी. व्ही. थोरे, डॉ. सी. डी. करे, प्रा. डॉ. ए. एस. आष्टे, डॉ. डी. एस. पिराजदार आदींची उपस्थिती होती. जगभरातील लोकांना मानवाधिकाराकडे आकर्षित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने १९५० ला १० डिसेंबर हा दिवस मानवाधिकार दिवस म्हणून घोषित केला आहे. तेव्हापासून जगभरात जागतिक मानवाधिकार दिवस म्हणून साजरा केला जातो, असे सांगितले. सुसंस्कृत विद्यार्थी घडल्यास आपोआप सुसंस्कृत समाज निर्माण होऊन देशाच्या प्रगतीसाठी मदत होईल.



ॲड. शुभदा पोतदार यांनी शिवाजी महाविद्यालयात मार्गदर्शन केले.

### व्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी..

यावेळी बोलताना उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले म्हणाले की, समाजातील प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधित राहावे, व्यक्तीला सन्मानपूर्वक जगता यावे यासाठी १० डिसेंबर हा दिवस जागतिक मानवाधिकार दिवस म्हणून साजरा केला जातो. मानवाधिकाराचे घोषणापत्र संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ रोजी पॅरिस येथे स्वीकारले.

**दैनिक दिव्य मराठी :१२/१२/२०१८**

**महिला सबलीकरण सप्ताह** • डॉ. मनोरंजना निर्मळे यांचे मत, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयोजन

# मानसिकता बदलून विविध क्षेत्रात पुढाकार घ्यावा

**प्रतिनिधी** | उमरगा

लोकसंख्येच्या ५० टक्के महिला असताना महिलांना पुरुषप्रधान संस्कृतीत जगावे लागते आहे. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात महिलांना दुय्यम वागणूक मिळत आहे. त्यामुळे महिलांनी आपली मानसिकता बदलून विविध क्षेत्रात पुढाकार घ्यावा. आपण कोण आहे, आपणास काय करायचे, याचे आत्मभान जपल्यास महिला सक्षम होईल, असे मत डॉ. मनोरंजना निर्मळे यांनी येथे व्यक्त केले.

शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात महिला सबलीकरण कक्ष व मानवी हक्क विभागाच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त ०३ ते १० जानेवारी दरम्यान आयोजित महिला सबलीकरण सप्ताहात डॉ. निर्मळे बोलत होत्या. महिला सबलीकरण सप्ताहाचा शुभारंभ प्राचार्य डॉ. जी. एच जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. सात दिवस चालणाऱ्या उपक्रमात मुलींसाठी वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, मुलींची आरोग्य तपासणी, बेसिक मेहंदी कोर्स आदी उपक्रम मानवी हक्क व महिला सबलीकरण कक्षाच्या वतीने घेण्यात येणार आहेत. तरी मुलींनी सहभाग घ्यावा, असे आवाहन समन्वयक उपप्राचार्य प्रा. डॉ. संजय अस्वले यांनी केले. यावेळी प्रा. आर. आर. नितनवरे, प्रा. ज्योती जोडदापके यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. ए एस शिंदे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. बकुळा कांबळे यांनी केले. प्रा. आर. आर. नितनवरे यांनी आभार मानले.



महिला सबलीकरण सप्ताहाचा शुभारंभ प्राचार्य डॉ. जाधव यांच्या हस्ते झाला.

### वक्तृत्व स्पर्धेत २२ विद्यार्थिनींचा सहभाग

सावित्रिबाई फुले व त्यांचे शैक्षणिक कार्य व महिला सबलीकरण या विषयावर वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयातील २२ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. प्रथम क्रमांक पल्लवी जगताप, द्वितीय प्रतीक्षा होळगीरे, तृतीय पल्लवी जाधव यांनी पटकावला. तर कुमारी चंडकापुरे हिला उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षण प्रा. निर्मला दुड्डे, प्रा. वर्षा कदम व प्रा. वसुधा निचळ यांनी केले. क्रमांकानुसार बक्षीस देण्यात आले

**दक्षता आरोग्याची** • उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात जिजाऊ जयंतीनिमित्त उपक्रम

# २५० विद्यार्थिनींच्या हिमोग्लोबीनची तपासणी

**प्रतिनिधी** | उमरगा

येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद, राष्ट्रमाता जिजाऊ जयंतीनिमित्त आयोजित मेगा हिमोग्लोबिन पडताळणी शिबिरात महाविद्यालयातील २७५ विद्यार्थिनींनी आपल्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी लॅबकडे पाठवून तपासणी करून घेतली.

यावेळी मार्गदर्शन करताना वुमन एम्पॉवरमेंट सेलच्या समन्वयक डॉ. मनोरंजना निर्मळे यांनी मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, कुटुंबात महिलांवर कामाचा सर्वाधिक ताण असतो. घरातील सर्व कामे करत नव्या युगातील महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून नोकरी व्यवसायातही अग्रेसर आहेत. मात्र, सर्व व्याप सांभाळत असताना त्या स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. स्त्रीयांनी स्वतःच्या आरोग्याकडे जागरूकपूर्वक लक्ष दिले पाहिजे. महिलांनी वेळीच उपचार घेतल्यास त्यांची कार्यक्षमता वाढून पर्यायाने कार्यकुशलता वाढण्यास मदत होईल. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. आशा शिंदे, प्रा. रेशमा नितनवरे, प्रा. बकुळा कांबळे उपस्थित होते.



शिवाजी महाविद्यालयात हिमोग्लोबीन तपासणीसाठी विद्यार्थिनींच्या रक्ताचे नमुने घेतले.

### यशस्वीतेसाठी लाभले यांचे सहकार्य

महिला व मुलींचे आरोग्य चांगले राहणे कुटुंबाच्या स्वास्थ्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी आयोजित शिबिराच्या यशस्वीतेसाठी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. पंडित पुरी, समुपदेशक अभय भालेराव, महालॅबचे इलाही शेख, अनिल चव्हाण, सोहेल तांबोळी, हरी चव्हाण, उपप्राचार्य डी. व्ही. थोरे, प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. सी. व्ही. पवार, प्रा. ज्योती जोडदापके, प्रा. विना लोकरे, प्रा. निर्मला दुड्डे, प्रा. वसुंधरा निचळ, प्रा. हिना सय्यद, प्रा. माळी आदींनी परिश्रम घेतले.

**दैनिक दिव्य मराठी :२२/०१/२०१९**

# एड्स दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी काढली सुरक्षा, संरक्षण रॅली

**दैनिक आनंद नगरी : ०४/०१/२०१९**

सकाळ



उमरगा : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना अ‍ॅड. शुभदा पोतदार. यावेळी प्राचार्य जाधव, उपप्राचार्य संजय अस्वले, प्रा. इंगळे, प्रा. थोरे आदी.

# जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त कार्यक्रम

उमरगा, ता. १० (बातमीदार) : येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त सोमवारी (ता. १०) कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी अ‍ॅड. शुभदा पोतदार यांनी 'कायदेशीर अधिकार व हक्क' या विषयावर मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. जाधव, उपप्राचार्य व आजीवनचे समन्वयक प्रा. संजय अस्वले, उपप्राचार्य इंगळे, प्रा. थोरे, प्रा. करे, प्रा. आडे, प्रा. बिराजदार यांची उपस्थिती होती. डॉ. अस्वले यांनी प्रास्ताविकात समाजातील प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधित राहावे, त्याच व्यक्तीला सन्मानपूर्वक जगता यावे यासाठी १० डिसेंबर हा दिवस जागतिक मानवाधिकार दिवस म्हणून साजरा केला जात असल्याचे सांगितले. मानवाधिकाराचे घोषणापत्र संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ रोजी पॅरिस येथे स्वीकारले.

जगभरातील लोकांना मानवाधिकाराकडे आकर्षित करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने १९५० मध्ये १० डिसेंबर हा दिवस मानवाधिकार दिवस म्हणून घोषित केला. तेव्हापासून जगभरात १० डिसेंबर हा जागतिक मानवाधिकार दिवस म्हणून साजरा केला जातो.

Aurangabad, Osmanabad Today 11/12/2018 Page No. 3

**दैनिक सकाळ : ११/१२/२०१८**

दिव्य मराठी उस्मानाबाद, सोमवार, ३ डिसेंबर २०१८

जागतिक एड्स दिन • जिल्हाभरात आरोग्य विभाग, रोटरी क्लब, स्वयंसेवी संस्थांच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन

# शाळा, रुग्णालयांच्या वतीने फेरी काढून घोषणांसह फलकांद्वारे जनजागृती; एड्स प्रतिबंधाची घेतली शपथ

टीम दिव्य मराठी | उस्मानाबाद

## महाविद्यालयांमध्ये पोस्टर प्रदर्शनातून संसर्गाविषयी मार्गदर्शन, वक्तृत्व, निबंध स्पर्धांचे आयोजन



उमरगा येथे उपजिल्हा रुग्णालय व रोटरीच्या वतीने जनजागृती फेरी काढण्यात आली.



## कळंबमध्ये मार्गदर्शन, शहरातून जनजागरण फेरी

## लोहाऱ्यातील गावांत जनजागृती कार्यक्रम

**दैनिक दिव्य मराठी : ०३/१२/२०१८**



उमरगा : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयामध्ये मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. जी. एन. सोमवंशी. यावेळी उपस्थित प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, डॉ. डी. एस. बिराजदार आदी.

## '...तोपर्यंत लोकशाही बळकट बनणार नाही'

उमरगा : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयामध्ये मंगळवारी (ता. २२) राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदार जनजागृती सप्ताहनिमित्त निवडणूक आयोग, तहसील कार्यालय व इतिहास विभाग यांच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव अध्यक्षस्थानी होते. प्रमुख वक्ते डॉ. जी. एन. सोमवंशी म्हणाले की, निवडणुका हा लोकशाहीचा कणा असून जोपर्यंत निर्भय व निष्पक्षपणे मतदान प्रक्रिया पार पडणार नाही तोपर्यंत लोकशाही बळकट बनणार नाही. प्राचार्य डॉ. जाधव यांनीही भारतातील निवडणुका व मतदान प्रक्रिया यावर भाष्य केले. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, नोडल अधिकारी डॉ. एस. एन. अस्वले, प्रा. धुळे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. इतिहास विभागप्रमुख डॉ. डी. एस. बिराजदार यांनी प्रास्ताविक केले. पल्लवी गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले, प्रा. दिनेश किरमिडे यांनी आभार मानले.

**दैनिक दिव्य मराठी : २२/१/२०१९**

लोकमत



उमरगा येथे मतदार दिनानिमित्त शपथ घेताना विद्यार्थी, नागरिक.

## मतदान अधिकारी, गुणवंतांचा सत्कार

उमरगा : तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय व श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. प्रारंभी शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात उत्कृष्ट मतदार अधिकाऱ्यांसह विविध स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विठ्ठल उदमले, उपविभागीय पोलीस अधिकारी राहूल धस, पोनि माधवराव गुंडीले, तहसीलदार संजय पवार, तहसीलदार राहूल पाटील, पोनि सर्जेराव भंडारे, नायब तहसीलदार विलास तरंगे, प्राचार्य डॉ. घनशाम जाधव, शिक्षणाधिकारी देविदास बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक तहसीलदार संजय पवार यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीण स्वामी यांनी तर आभार नायब तहसीलदार विलास तरंगे यांनी मानले.

Hello Osmanabad
Page No. 3 Jan 28, 2019
Powered by: erelego.com

**दैनिक लोकमत : २८/०१/२०१९**

# जागृती, कार्यक्रम, मार्गदर्शन, फेरी असे विविध कार्यक्रम





उमरगा : विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांसमवेत उपविभागीय अधिकारी विठ्ठल उदमले, पोलिस अधिकारी राहुल धस, संजय पवार, माधवराव गुंडिले, प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, प्रकाश पाटील, देविदास बनसोडे आदी. (दुसऱ्या छायाचित्रात) श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयासमोर विविध शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी, मतदार यांनी मतदानाची प्रतिज्ञा घेतली.

## 'शंभर टक्के मतदान म्हणजे सुदृढ लोकशाहीचे द्योतक'

**उमरगा, ता. २५ (बातमीदार)** : लोकशाही प्रगल्भ करण्यासाठी प्रत्येक मतदारांचा मतदान प्रक्रियेत सहभाग आवश्यक आहे. शंभर टक्के मतदान म्हणजे सुदृढ लोकशाहीचे द्योतक असते, असे मत उपविभागीय अधिकारी विठ्ठल उदमले यांनी व्यक्त केले.

तहसील कार्यालयातील निवडणूक विभागाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शुक्रवारी (ता. २५) श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल धस, तहसीलदार संजय पवार (उमरगा), तहसीलदार राहुल पाटील (लोहारा), पोलिस निरीक्षक माधवराव गुंडिले (उमरगा), सर्जेराव भंडारे (लोहारा), प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, मुख्याधिकारी प्रकाश पाटील, गटशिक्षणाधिकारी देविदास बनसोडे, उपप्राचार्य डॉ. धनाजी थोरे, संविधान मंचचे अध्यक्ष अशोक बनसोडे, रोटरी क्लबचे अध्यक्ष संतराम मूरजानी, सचिव डॉ. धनंजय मेनकुदळे आदी उपस्थित होते.

तहसीलदार श्री. पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण स्वामी यांनी सूत्रसंचालन केले; तर नायब तहसीलदार विलास तरंगे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, नायब तहसीलदार रणजित शिराळकर, विस्तार अधिकारी मंदाकिनी मोरे, विलास राठोड, केंद्रप्रमुख सुभाष चव्हाण, शीला मुदगडे, श्री. दुधनाळे, बी. एस. पवार, श्री. लोखंडे, मुख्याध्यापक धनराज तेलंग, रघुवीर आरणे, प्रा. डॉ. बालाजी मोरे, निवडणूक विभागातील विनोद स्वामी, दत्ता पवार, श्री. सरपे उपस्थित होते. या वेळी मतदारांना व्हीहीपॅटचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

### उमरग्यात विद्यार्थ्यांनी केली जनजागृती

शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी मतदानाचा पवित्र हक्क बजावण्यासाठी विविध घोषणा देत प्रमुख मार्गावरून फेरी काढली. भारत विद्यालय, जिजामाता विद्यामंदिर, निवासी मूकबधीर विद्यालय, महात्मा गांधी विद्यालय, कु. माधवी चालुक्य विद्यालय, जिल्हा परिषद प्रशाला, महात्मा बसवेश्वर विद्यालय, शरणाप्पा मलंग विद्यालय, आदर्श विद्यालय, डॉ. के. डी. शेंडगे इंग्लिश स्कूल यांच्यासह श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, आदर्श महाविद्यालयाचे विद्यार्थी या फेरीत सहभागी झाले होते.

**दैनिक सकाळ : २७/१/२०१९**

# शिवाजी महाविद्यालयात मतदारांनी घेतली मतदान करण्याची शपथ

उमरगा, दि. २५ (प्रतिनिधी) : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग, मतदार साक्षरता क्लब, एन. सी. सी., इतिहास विभाग, राज्यशास्त्र विभाग, भूगोल विभाग, तहसील कार्यालय, उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने ते जानेवारी हा कालावधी मतदार जनजागृती सप्ताह म्हणून साजरा करण्यात आला. लोकशाही बळकट करण्यासाठी मतदाराने मतदान केंद्रापर्यंत जाऊन योग्य उमेदवाराला मतदान करणे गरजेचे आहे. त्यासाठी मतदारांमध्ये जनजागृती कार्यक्रम शुक्रवारी (ता.) रोजी राबवण्यात आला. यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन, व्याख्याने, व्हीव्हीपॅट यंत्राचा डेमो आदी उपक्रमाच्या माध्यमातून जागृती करण्यात आली. मतदार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी जागरूक मतदार बनून योग्य उमेदवाराला मतदान करावे असे आवाहन प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी केले. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मतदान करण्याची शपथ देण्यात आली. याप्रसंगी उमरगा शहरातील सर्व शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, नोडल अधिकारी डॉ. एस. एन. अस्वले, उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर, प्रा. आर. एम. सूर्यवंशी, प्रा. डी. डी. पांढरे, मेजर प्रा. डी. एस. चितमपल्ले, नोडल अधिकारी प्रा.




घले, प्रा. एस. ई. बिराजदार, डॉ. डी. बी. ढोबळे, प्रा. एस. डी. गावित, तहसील कार्यालयातील अधिकारी, रासेयो स्वयंसेवक, एन सी सी कॅडेट्स, आदि उपस्थित होते.

**दैनिक जनमत : २७/०१/२०१९**

# स्वच्छता व जल संवर्धनासाठी युवा विशेष शिबीर (१७ डिसेंबर ते २३ डिसेंबर)

**आदर्श गावकरी**

## गावाच्या विकासात शेतीपूरक उपकरणांचा वापर करावा

▶ तलमोड येथे रासेयो निवासी शिबिराची सुरुवात



उमरगा / प्रतिनिधी

जलसंवर्धन शेती व्यवसायास संजीवनी देते. गावाच्या विकासात शेतीपूरक उपकरणांचा सुयोग्य वापर केल्यास वेळ, इंधन व मानवीय ऊर्जेचा चांगला उपयोग होईल असे मत पंचायत समितीच्या कृषी अधिकारी सारिका अंबुरे-लोकरे यांनी व्यक्त केले.

उमरगा शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातर्फे तलमोड गावात सोमवारी (दि.१७) स्वच्छता व जलसंवर्धनासाठी निवासी विशेष युवा शिबिराला प्रारंभ करण्यात आला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोल मोरे तर प्राचार्य डॉ.जी.एच.जाधव, भारत शिक्षण संस्थेचे संचालक दिगंबर बिराजदार, उपप्राचार्य डी.व्ही.थोरे, सरपंच मनिषा सुगिरे, डॉ.सुभाष वाघमोडे, उपप्राचार्य डॉ.संजय अस्वले यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ग्रामस्थांच्या सामाजिक गरजांचा अभ्यास करून त्यांना मदतीचा हात द्यावा. तसेच गावाच्या विकासात सहकार्य करावे असे आवाहन अमोल मोरे यांनी केले. उद्घाटन प्रसंगी उपसरपंच माधव शिंदे, एस.एस.कांबळे, दगडू मोरे, दत्तू जाधव, बालाजी मोरे, अशोक मोरे, सुभाष मोरे, पवन स्वामी आदी मान्यवर हजर होते. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.विनोद देवरकर, सूत्रसंचालन आर.एम.खराडे तर डॉ.सी.डी.करे यांनी आभार मानले.

Latur Edition
19 Dec, 2018 Page No. 11
Powered by : erelego.com



## जलसंर्वधन केल्यास शेती उद्योग संजिवनी

**उमरगा/प्रतिनिधी :** शेतातील पाण्याचे उपयोग चांगल्या पध्दतीने त्याचे जलसंवर्धन केल्यास ते शेतीस संजीवनी देते असे मत सारिका लोकरे यांनी केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे स्वच्छता व जलसंवर्धन साठी विशेष युवा शिबिर याचे मौजे तलमोड येथे सोमवार १७ रोजी सुरुवात झाली. अध्यक्षस्थानी भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे होते.

पुढे बोलताना श्रीमती लोकरे म्हणाल्या भारत हा कृषिप्रधान देश आहे. जलसंवर्धन शेती व्यवसायास संजीवनी देते. गावाच्या विकासात शेतीपूरक उपकरणांचा सुयोग्य वापर केल्यास वेळ, इंधन व मानवीय ऊर्जेचा चांगला उपयोग होईल असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ग्रामस्थांच्या सामाजिक गरजांचा अभ्यास करून त्यांना मदतीचा हात द्यावा. गावाच्या विकासात सहकार्य करावे अध्यक्ष मोरे यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. आर एम. सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. बी. ए. शेळके, प्रा. ए. डी. देशमुख, प्रा. पी. के. गायकवाड, डॉ. सी. डी. करे, प्रा. मारुती व्हनाळे, मुरलीधर जाधव आदींनी प्रयत्न केले. प्रस्तावना डॉ. विनोद देवरकर, सूत्रसंचालन आर. एम. खराडे तर आभार डॉ. सी डी करे यांनी मानले.

आदर्श गावकरी : १९/१२/२०१८

आनंद नगरी : १९/१२/२०१८

**स्वच्छता, जलसंवर्धन शिबिर** • भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे यांचे आवाहन

## रासेयो स्वयंसेवकांनी समस्या जाणून ग्राम विकासासाठी प्रबोधन करावे

प्रतिनिधी | उमरगा

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे स्वच्छता व जलसंवर्धनासाठी विशेष युवा शिबिराचे तालुक्यातील तलमोड येथे सोमवारपासून (दि.१७) सात दिवस चालणाऱ्या विशेष युवा शिबिरास पंचायत समितीच्या कृषी अधिकारी सारिका लोकरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली.

भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे अध्यक्षस्थानी होते. यावेळी भारत शिक्षण संस्था संचालक डॉ. सुभाष वाघमोडे, दिगंबर बिराजदार, प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, प्रा. डी. व्ही. थोरे, सरपंच मनीषा सुगिरे, उपसरपंच माधव शिंदे, ग्रामविकास अधिकारी एस. एस. कांबळे, माजी उपसभापती दगडू मोरे, तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष दत्तू जाधव, बालाजी मोरे, अशोक दादाराव मोरे, सुभाष मोरे, पोलिसपाटील पवन स्वामी आदी उपस्थित होते. डॉ. सुभाष वाघमोडे यांनी युवक कसा असावा हे सांगताना छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची उदाहरणे देऊन स्वयंसेवकांना प्रेरित केले. उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी जलसंवर्धन व युवा याबद्दल मार्गदर्शन केले. शिबिर यशस्वी होण्यासाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर, प्रा. आर. एम. सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. बी. ए. शेळके, प्रा. ए. डी. देशमुख, प्रा. पी. के. गायकवाड, डॉ. सी. डी. करे, प्रा. मारुती व्हनाळे, प्रा. मुरलीधर जाधव पुढाकार घेत आहेत. डॉ. विनोद देवरकर यांनी प्रास्ताविक केले. आर. एम. खराडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सी. डी. करे यांनी आभार मानले.

### तलमोडला कृषी अधिकारी सारिका लोकरे यांच्या हस्ते शुभारंभ



तलमोडमध्ये श्री शिवाजी महाविद्यालयाच्या शिबिरात मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

### जलसंवर्धन देते शेती व्यवसायास संजीवनी

कृषी अधिकारी सारिका लोकरे युवा व ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या भारत हा कृषिप्रधान देश आहे. जलसंवर्धन शेती व्यवसायास संजीवनी देते. गावाच्या विकासात शेतीपूरक उपकरणांचा सुयोग्य वापर केल्यास वेळ, इंधन, मानवीय ऊर्जेचा चांगला उपयोग होईल. जलसंवर्धनासाठी असलेल्या या शिबिरातून युवकांनी स्वतः बरोबरच गावाच्या विकासासाठी मार्गदर्शन करावे, असे मत व्यक्त केले.

### ग्रामस्थांच्या सामाजिक गरजांचा अभ्यास करावा

अध्यक्ष अमोल मोरे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ग्रामस्थांच्या सामाजिक गरजांचा अभ्यास करून त्यांना मदतीचा हात द्यावा. गावाच्या समस्या आणि विकासकामांची माहिती घेऊन ग्रामस्थ व ग्रामपंचायतीला प्रबोधन करून सहकार्याचे आवाहन केले.

दैनिक दिव्य मराठी :२०/१२/२०१८

**आदर्श गावकरी**

# मुलींनी बेडरपणे व्यक्त व्हावे : प्रा. लोकरे

**उमरगा / प्रतिनिधी**



निसर्गाने स्त्री-पुरुष असा भेदभाव न ठेवता दोघांचीही क्षमतापूर्ण निर्मिती केली. मुलांनी मुलींकडे बघण्याचा दृष्टीकोन सम तोल ठेवला तर स्त्री सक्षमकरणाची गरजच पडणार नाही. मुलींनीही बेडरपणे व्यक्त व्हायला शिकले पाहिजे असे मत प्रा. बिना लोकरे यांनी व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वच्छता व जलसंधारणासाठी युवा शिबिर हे तलमोड येथे सुरु आहे. यानिमित्त स्वयंसेविकासाठी स्वसंरक्षण-काळाची गरज या विषयावर महिला मेळावा आयोजित केला होता. यावेळी स्वयंसिद्धा मराठवाडा प्रभागाच्या अध्यक्षा रोहिणी बनसोडे या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या.

मुलींना समाजात वावरताना अनेक संकटांना सामोरे जात शिक्षण, नोकरी, संसार करावा लागतो. त्यामध्ये त्यांचा मानसिक व प्रसंगी शारीरिक छळ केल्या जातो. त्यापासून बचाव व संरक्षण करण्यासाठी त्यांनी स्वयंसिद्ध झाले पाहिजे. प्रतिकार केला पाहिजे असे प्रतिपादन बनसोडे यांनी केले. यावेळी मुलींनी स्वसंरक्षण कसे करावे याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

याप्रसंगी प्रा.हिना सय्यद, प्रा. श्रीमती बकुळ कांबळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला कार्यक्रमाधिकारी प्रा.राजेंद्र सूर्यवंशी, प्रा.सुजित शिंदे, प्रा.डी.डी. पांढरे, प्रा.खराडे, प्रा.करे, प्रा.शेळके, प्रा.मुरलीधर जाधव, प्रा. देशमुख, प्रा. मारुती व्हनाळे यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, सर्व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. एम. एस. निर्मले, सुत्रसंचालन प्रतीक्षा पाटील तर डॉ. आशा शिंदे यांनी आभार मानले.

Latur Edition
22 Dec, 2018 Page No. 11
Powered by : erelego.com

**दैनिक आदर्श गावकरी: २२/१२/२०१८**

# जलस्रोत वापराचे नियोजनच जगाला वाचवेल

## रासेयोच्या शिबिरात डॉ. पद्माकर पिटले यांचे मत

**प्रतिनिधी** | उमरगा

जगभरात पिण्याच्या पाण्याचा साठा केवळ २.५ ते ३ टक्के आहे. तेही फक्त पावसाच्या माध्यमातून मिळतो. पावसाचे प्रमाण वाढवायचे असेल तर वृक्षारोपण करावे लागेल आणि उपलब्ध असलेल्या जलस्रोतांचे काटेकोर नियोजन करावे लागेल, असे मत डॉ. पद्माकर पिटले यांनी व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वच्छता-जलसंधारणासाठी युवा विशेष शिबिर तालुक्यातील तलमोड येथे सुरू असून शिबिरामध्ये 'जलसंवर्धनामध्ये युवकांची भूमिका' या विषयावर डॉ. पिटले बोलत होते. यावेळी श्रमदानातून श्रमप्रतिष्ठा निर्माण होते. स्वयंसेवकांनी न लाजता समाजासाठी कार्य करावे, असे मत डॉ. अजित आष्टे यांनी व्यक्त केले. यावेळी माधव गणपती शिंदे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. व्ही. डी. देवरकर यांनी सूत्रसंचलन केले. डॉ. सी. डी. करे यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. आर. एम. खराडे, प्रा. सी. डी. करे, प्रा. बी. ए. शेळके, प्रा. मुरली जाधव, प्रा. ए. डी. देशमुख, प्रा. मारुती व्हनाळे, अरविंद पाटील रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.



### पुनर्भरण हा एकमेव पर्याय, जलसंवर्धनाची सवय बाळगा

जलसंवर्धन दैनंदिन कृतीतून केले पाहिजे. आपल्या सवयी बदलल्या पाण्याचा अपव्यय न करता त्याचे जतन करणाऱ्या असाव्यात. कूपनलिका, विहिरी यांचे पुनर्भरण केले तर जलसाठा टिकवून ठेवण्यास मदत होईल, अन्यथा नजीकच्या भविष्यात मोठ्या पाणी संकटास सामोरे जावे लागेल. स्वच्छता, स्वयंशासन व संस्कृती जतन व्हावी, यासाठी महात्मा गांधी यांच्या विचारांचा अंगीकार सर्वांनी केला पाहिजे. असे मत प्रा. ई. जे. बिराजदार यांनी व्यक्त केले. यावेळी प्रा. एस. टी. दाडगे. प्रा. पी. डी. पाटील, संगमेश्वर कलशेट्टी उपस्थिती होती.

**दैनिक दिव्य मराठी : २४/१२/२०१८**

# रोसेयो शिबिरातून श्रमसंस्कार, घडतात देशाचे उत्तम नागरिक

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे गटसमन्वयक डॉ. राम कदम यांचे मत**

उमरगा । राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरांमधुन होणारे स्वयंसेवकांचे श्रमदान हेच श्रमसंस्कार घडवतात. यामुळे युवकांमध्ये सेवाभावी वृत्ती, आत्मविश्वास वृद्धिंगत होतो. रासेयो शिबिरातून देशाचा उत्तम नागरिक घडतो, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे गटसमन्वयक डॉ. राम कदम यांनी येथे व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे 'स्वच्छता व जलसंवर्धनसाठी विशेष युवा शिबिराचा तलमोड येथे रविवारी (दि.२३) समारोप झाला, यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव हे होते. यावेळी उपप्राचार्य डी. व्ही. थोरे उपस्थित होते. डॉ. राम कदम म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये सेवावृत्तीचे बीजारोपण करण्यासाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने अनेक कार्यक्रम राबवले जात असून त्यापैकी सर्वात महत्वपूर्ण शिबिराचा उपक्रम असतो, अशी निवासी शिबिरे विद्यार्थ्यांवर संस्कार घडवून आमुलाग्र बदल घडवून आणतात. जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने बघायला शिकवतात, असे मत डॉ. घनश्याम जाधव यांनी व्यक्त केले. उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे यांनी यावेळी स्वयंसेवकांसोबत संवाद साधला. रोहित गायकवाड, गौरव इगवे, विशाल सुगीरे व सुदर्शन लोमटे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, डॉ. डी. पी. चव्हाण, प्रा. बी. जी. बोटेवड, डॉ. संतोष कदम, ग्रामस्थ, कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर, प्रा. आर. एम. सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. बी. ए. शेळके, प्रा. ए. डी. देशमुख, प्रा. पी. के. गायकवाड, डॉ. सी. डी. करे, प्रा. मारुती व्हनाळे, प्रा. मुरलीधर जाधव, अरविंद पाटील उपस्थित होते. डॉ. विनोद देवरकर यांनी प्रास्ताविक तर डॉ. सी. डी. यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. आर. एम. खराडे यांनी आभार मानले.

**दैनिक दिव्य मराठी : २५/१२/२०१८**

## आदर्श गावकरी

# रासेयो शिबिरातून स्वयंसेवकांचे श्रमदान हेच श्रमसंस्कार घडवतात

**उमरगा / प्रतिनिधी**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरांमधून होणारे स्वयंसेवकांचे श्रमदान हेच श्रमसंस्कार घडवतात. यामुळे युवकांमध्ये सेवाभावी वृत्ती, आत्मविश्वास वृद्धिंगत होतो. रासेयो शिबिरातून देशाचा उत्तम नागरिक घडतो, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे गटसमन्वयक डॉ. राम कदम यांनी येथे व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे 'स्वच्छता व जलसंवर्धनसाठी विशेष युवा शिबिराचा तलमोड येथे रविवारी (दि.२३) समरोप झाला, यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव हे होते. यावेळी उपप्राचार्य डी. व्ही. थोरे उपस्थित होते. उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे यांनी यावेळी स्वयंसेवकांसोबत संवाद साधला. रोहित गायकवाड, गौरव इगवे, विशाल सुगीरे व सुदर्शन लोमटे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्राचार्य डॉ. जी.एच.जाधव, डॉ.डी.पी.चव्हाण, प्रा.बोटेवड, डॉ.संतोष कदम, ग्रामस्थ, कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही.डी.देवरकर, प्रा.आर.एम.सूर्यवंशी, प्रा.एस. डी.शिंदे, प्रा.पांढरे, प्रा.शेळके, प्रा.देशमुख, प्रा. गायकवाड, डॉ. करे, प्रा. मारुती व्हनाळे, प्रा. मुरलीधर जाधव, अरविंद पाटील उपस्थित होते. डॉ. विनोद देवरकर यांनी प्रास्ताविक तर प्रा. खराडे यांनी आभार मानले.

Latur Edition
26 Dec, 2018 Page No. 11
Powered by : erelego.com

**दैनिक आदर्श गावकरी : २६/१२/२०१८**

# पशुधन जपणे काळाची गरज–डॉ.अनिल यंपाळे



उमरगा/प्रतिनिधी

शेती व्यवसायात प्रगती करण्यासाठी पशुधन जपणे महत्वाचे आहे. पशुधनापासून तयार होणारे खत हे शेतीच्या व्यवस्थापनाच्या यशातील महत्वाचा वाटा आहे.

पशुधनापासून मिळणारे दुध हा आहारातील प्रमुख घटक असुन बलवान व सुदृढ होण्यासाठी आवश्यक आहे. पशुधन तंदुरुस्त असल्यास त्याच्या मलम ...ाचा दुर्गंध येत नाही. त्याम...ळे वायुप्रदूषण, जलप्रदूषण, घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न निर्माण होत नाहीत असे प्रतिपादन पशुधन पर्यवेक्षक अनिल यंपाळे यांनी केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वच्छता व जलसंधारणासाठी युवा शिबिर आयोजित आयोजीत करण्यात आले होते. पशु आरोग्य शिबिर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व चिकित्सक म्हणून डॉ. अनिल यंपाळे यांना आमंत्रित केले होते.

या प्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, प्रा राजेंद्र सूर्यवंशी, प्रा सुजित शिंदे, प्रा डी डी पांढरे, प्रा. आर एम खराडे, प्रा. सी डी करे, प्रा. बी. ए. शेळके, प्रा मुरलीधर जाधव, प्रा ए डी देशमुख, प्रा. मारुती व्हनाळे, श्री दाजीबा मोरे व सर्व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

**दैनिक जनमत : २२/१२/२०१८**

# रासेयो शिबिरे अनुभवविश्व समृद्ध करतात– डॉ. राम कदम

उमरगा /प्रतिनिधी

राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरांमधून होणारे स्वयंसेवकांचे श्रमदान त्यांच्यावर श्रमसंस्कार हे घडवत असतात. ज्यामुळे त्यांच्या मधील आत्मविश्वास, सेवाभावी वृत्ती ही वृद्धिंगत होत असते. अशाच शिबिरांमधून देशाचा उत्तम नागरिक घडत असतो. बौद्धिक गटचर्चा व व्याख्यानांच्या माध्यमातून अनेक अनुभवी चिंतनशील व्याख्यात्यांचे जीवनानुभव स्वयंसेवकांच्या कानी पडत असतात ज्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध होत असते असे मत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे गटसमन्वयक डॉ. राम कदम यांनी व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे स्वच्छता व जलसंवर्धन साठी विशेष युवा शिबिर याचे मौजे तलमोड येथे आज दिनांक २१/१२/२०१८ रोजी समारोप प्रसंगी ते बोलत



होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव हे होते तर प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डी. वी. थोरे यांची होती.

विद्यार्थ्यांमध्ये सेवावृत्तीचे बीजारोपण करण्यासाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने अनेकविध कार्यक्रम राबवले जात असतात. त्यापैकी अतिशय महत्वाचा शिबिराचा उपक्रम असतो. ही निवासी शिबिरे विद्यार्थ्यांवर संस्कार करतात व त्यांच्यात अनुलाग्र बदल घडवून आणतात. त्यांना जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने जगाकडे बघायला शिकवतात असे प्रतिपादन डॉ. घनश्याम जाधव यांनी या वेळी केले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे समन्वयक डॉ. टी. आर. पाटील यांनी दूरध्वनीवरून स्वयंसेवकांशी संवाद साधून प्रत्यक्ष आयुष्यात जगतानाही 'नॉट मी, बट यू' चे तत्व अवलंबावे असे सांगितले. उपप्राचार्य प्रा. डी. वी. थोरे यांनीही यावेळी स्वयंसेवकांसोबत संवाद साधला. तसेच रोहित गायकवाड, गौरव इगवे, विशाल सुगीरे व सुदर्शन लोमटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, उपप्राचार्य डी. वी. थोरे, डॉ. डी. पी. चव्हाण, प्रा. बी. जी. शोटेवड, डॉ. संतोष कदम, तलमोड गावातील सर्व प्रतिष्ठित मंडळी यासोबतच कार्यक्रमाधिकारी डॉ. व्हि. डी. देवरकर, प्रा. आर एस. सूर्यवंशी, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. बी. ए. शेळके, प्रा. ए. डी. देशमुख, प्रा. पी. के. गायकवाड, डॉ. सी. डी. करे, प्रा. मारुती म्हनाळे, प्रा. मुरलीधर जाधव, श्री अरविंद पाटील, आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाची प्रस्तावना कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सी. डी. यांनी केले तर प्रा. आर. एम. खराडे यांनी आभार मानले.

**दैनिक जनमत : २६/१२/२०१८**

# आरोग्यासाठी दूध देणाऱ्या पशुधनाची स्वच्छता महत्वाची



प्रतिनिधी | उमरगा

देश, गाव०च्या विकासामध्ये शेती व्यवसाय व पशुधन व्यवस्थापनाचा महत्वाचा वाटा असतो. छोट्या बालकापासून २५ वर्षांच्या तरुणापर्यंत दुधाचे सेवन करतो. आपल्या आरोग्यासाठी दुधाळ पशुधनाची व गोठ्याची स्वच्छता महत्वाची आहे, असे मत डॉ. अनिल यंपाळे यांनी व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वच्छता व जलसंधारणासाठी युवा शिबिर दरम्यान आयोजित पशू आरोग्य शिबिरात पशुधन चिकित्सक डॉ. अनिल यंपाळे बोलत होते. पुढे बोलताना डॉ. यंपाळे यांनी वायुप्रदूषण, जलप्रदूषण, घनकचरा व्यवस्थापनाचे प्रश्न निर्माण होत नसल्याचे सांगितले. कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. आर. एम. खराडे, प्रा. सी. डी. करे, प्रा. बी. ए. शेळके, प्रा. मुरलीधर जाधव, प्रा. ए. डी. देशमुख, प्रा. मारुती कनाळे, दाजीबा मोरे व सर्व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

**दैनिक दिव्य मराठी : २३/१२/२०१८**